प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग**, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

सप्टेंबर 30, 2019

**बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (एएसीएस) कलम 35 अ खालील निर्देश - दि सीकेपी को–ऑपरेटिव बँक लि., मुंबई, महाराष्ट्र**

दि सीकेपी को–ऑपरेटिव बँक लि., मुंबई, महाराष्ट्र ह्यांना, मे 2, 2014 रोजीचे व्यवहार समाप्त झाल्यापासून, निर्देश दि. एप्रिल 30, 2014 अन्वये निर्देशांखाली ठेवण्यात आले होते. त्यानंतरच्या निर्देशान्वये ह्या निर्देशांची वैधता वेळोवेळी वाढविण्यात आली होती व शेवटचे निर्देश जून 24, 2019 रोजीचे असून, ते पुनरावलोकनाच्या अटीवर सप्टेंबर 30, 2019 पर्यंत वैध होते.

जनतेच्या माहितीसाठी येथे अधिसूचित करण्यात येते की, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 56 सह वाचित कलम 35 अ च्या पोटकलम (1) खाली तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व्ह बँक येथे निर्देश देते की, वरील बँकेला देण्यात आलेले, वेळोवेळी सुधारित केलेले व शेवटून दि. सप्टेंबर 30, 2019 पर्यंत वैधता वाढविण्यात आलेले निर्देश दि. एप्रिल 30, 2014 पुनरावलोकनाच्या अटीवर, वरील बँकेला निर्देश दि. सप्टेंबर 25, 2019 अन्वये आणखी एक महिन्यासाठी, म्हणजे, ऑक्टोबर 1, 2019 ते ऑक्टोबर 31, 2019 पर्यंत लागु असणे सुरुच राहील.

वरील मुदतवाढ अधिसूचित करणा–या सप्टेंबर 25, 2019 रोजीच्या निर्देशाची एक प्रत, जनतेच्या माहितीसाठी वरील बँकेच्या कार्यालयात लावण्यात आली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेली वरील मुदतवाढ आणि/किंवा केलेला बदल ह्याचा अर्थ, वरील बँकेच्या आर्थिक स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली असल्याबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेचे समाधान झाले आहे असा घेण्यात येऊ नये.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/817**